# MARATHI

**[ MARCH - 2009 ]**

**Time : 3 Hours** **Marks : 80**

**प्र. 1. खालीलपैकी कोणत्याही तीन प्रश्नांची उत्तरे सुमारे 30 ते 40 शब्दांत लिहा : 12**

(1) प्लेगच्या साथीत सावित्रीबाई फुले यांनी कोणते कार्य केले ?
(2) नाईकबाईंच्या घरातील हळदीकुंकवाच्या सजावटीचे वर्णन करा.
(3) ज्योत्स्ना कदम यांच्या घरासभोवारच्या बागेचे वर्णन करा.
(4) लेखकाने हरिहरराव सोनुले यांचे कोणकोणते गुणविशेष सांगितले आहेत ?
(5) से. ले. राणे यांनी सुरुंग निकामी करण्यासाठी कोणते साहस केले ?

**प्र. 2. (क) खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात लिहा : 4**

(1) आक्काचे कोणते हुकमी वाक्य लेखकाला रोज आठवायचे ?
(2) जगूने पुस्तकातील चित्रे कोणाला दाखविली ?
(3) ग्यानबाने त्याचे शेत अमीरच्या वडिलांकडे किती रुपयांना गहाण टाकले होते ?
(4) पपईचे झाड केव्हा मरते ?

**(ख) पाठ्य-पुस्तकातील गद्यपाठाच्या आधारे खालील वाक्यांतील रिकाम्या जागी योग्य शब्द भरून तीं वाक्ये पुन्हा लिहा : 3**

(1) जोतीरावांच्या पश्चात सावित्रीबाईंनी .............. चळवळीचे नेतृत्व केले.
(2) गंगामाई वाहत होती, .............. गात होती.
(3) संत तुकारामांचा .............. हरिहररावांना विलक्षण आवडे.

**(ग) खालील वाक्य कोणी कोणास म्हटली ते लिहा : 3**

(1) "माही पोर गरीबाची हाय."
(2) "जा, माझा तुला आशीर्वाद आहे."
(3) "हळदीकुंकू देता ना ?"

**प्र. 3. खालीलपैकी कोणत्याही तीन प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी सुमारे ३० ते ४० शब्दांत लिहा : 12**

(1) 'काय करूं आतां धरुनियां भीड' या अभंगातून संत तुकाराम यांनी कोणता उपदेश केला आहे ?
(2) कवीचे मन बाळखेळण्यांतून का निघत नाही ?
(3) 'अंधार पखाली' या कवितेत कवीने कोणती अपेक्षा व्यक्त केली आहे ?
(4) 'कसं चालेल ?' असा प्रश्न कवी कोणकोणत्या संदर्भात करतात ?
(5) भक्तांवरील प्रेमासाठी विठ्ठल कोणकोणत्या गोष्टी करतो ?

**प्र. 4. (क) खालीलपैकी कोणत्याही एका काव्यपंक्तीचा संदर्भासह अर्थ लिहा : 3**

(1) पायीं पैंजण आणि वाळे । हातीं नवनीताचे गोळे ।।

(2) शब्दच शस्त्र, शब्दच अस्त्र, शब्दच युद्ध, शब्दच बुद्ध
हे वर्तमान नायका ! सूर्योदय तुझ्याकडे सोपवीत आहे.

**(ख) खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात लिहा : 3**

(1) गुरू कशाचे खंडन करतो ?

(2) जिव्हाळा लाभल्याने काय घडणार आहे ?

(3) कवीने काडीकाडी कशी जमा केली आहे ?

**प्र. 5. खालीलपैकी कोणत्याही दोन प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी सुमारे 40 ते 50 शब्दांत लिहा : 8**

(1) आजोबांनी दिलेले फूल आजीला दिल्यावर आजीने काय केले ?

(2) बाईंचे लग्न ठरल्यावर प्रीतमने त्यांना काय देऊ केले? का ?

(3) गणपा रावसाहेबांकडे कशासाठी आला होता ?

(4) 'काचेची किमया' या शीर्षकाचे महत्त्व विशद करा.

**प्र. 6. खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे सुमारे 150 शब्दांत निबंध लिहा : 10**

(1) मी केलेली सहल :
**मुद्दे :** सहलीला केव्हा गेलात - स्थळ व वेळ - सहलीचा प्रकार - शैक्षणिक, मनोरंजक - तेथील दृश्यांचे वर्णन - मौज - परत येताना मनात आलेले विचार.

(2) माझी आई :
**मुद्दे :** आईचे दैनंदिन कार्यक्रम - नोकरी - मुलांवर संस्कार - शिस्त - अभ्यास - आजारपणात शुश्रूषा - इतरांना मदत - घर प्रसन्न.

(3) मला पंख असते तर !
**मुद्दे :** कल्पना कशी सुचली ! - पाखरांचे स्वच्छंदी जीवन - आनंद - देशपरदेश पाहणे - ज्ञानप्राप्ती - देशसेवेसाठी प्रयत्न - भविष्यातील योजना.

(4) फळ्याचे आत्मवत्त :
**मुद्दे :** जन्मस्थळ - शाळेत स्थान - शिक्षकांचा पाठीराखा - मुलांचा सहाय्यक - जुन्या शिक्षकांच्या आठवणी - मुलांच्या आठवणी - हल्लीची मुले - शरीराची दुर्दशा - आवश्यक काळजी - दुरुस्ती व रंग - जीवनकार्य.

**प्र. 7. (क) कंसातील सूचनेप्रमाणे बदल करून शब्द पुन्हा लिहा (कोणतेही चार) : 2**

(1) लेखक, युवक, शेतकरी. (स्त्रीलिंग करा)

(2) बाहुली, शिष्या, सोबतीण. (पुल्लिंग करा)

**(ख) कंसातील सूचनेप्रमाणे वाक्यांत बदल करून वाक्ये पुन्हा लिहा : (कोणतीही दोन) 2**

(1) बालगंधर्वांच्या सुरांनी ते खूप मोहरून जात. (उद्गारार्थी करा)

(2) मला मराठीचे पुस्तक देता का ? (आज्ञार्थी करा)

(3) आजही माझं नातं झाडांशी आहे. (प्रश्नार्थी करा)
(4) जंगलातला पानगळीचा मोसम पाहिलाय का कधी कुणी ? (विधानार्थी करा)

**(ग) खालीलपैकी कोणतेही एक वाक्य लेखननियमांनुसार लिहा : 2**

(1) तुला तर घरबसळ्या संपतती मिळालीय.
(2) मग कधी-कधी माधुकरी मागावि लागे.

**(घ) खाली वाक्प्रचार व वाक्ये दिलेली आहेत. योग्य वाक्प्रचारांचा योग्य वाक्यात उपयोग करून ती वाक्ये पुन्हा लिहा (कोणतीही चार) : 4**

(डोळे भरून पाहणे, जमीनदोस्त होणे, इंगा दाखविणे, धाबे दणाणणे, अप्रूप वाटणे, भान हरपून जाणे.)

(1) भूकंपाच्या धक्क्यामुळे मोठमोठ्या इमारतीही पूर्णपणे ढासळतात.
(2) निसर्गातली रंगांची उधळण बघताना मी स्वतःला विसरून गेलो.
(3) यावर्षी परीक्षा लवकर होणार हे कळल्यावर आम्ही घाबरून गेलो.
(4) स्पर्धेत जिंकून आलेल्या आपल्या मुलाकडे आईने कौतुकाने पाहिले.
(5) जखमी झालेल्या वाघाने अखेर शिका-याला आपले सामर्थ्य दाखविले.
(6) वयाच्या तिस-या वर्षी रमेश संगणक शिकला याचे सर्वांना कौतुक वाटले.

**प्र. 8. (क) खालील दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे कोणतीही एक गोष्ट लिहा. शीर्षक देऊन तात्पर्य लिहा : 4**

(1) एक तलाव - बडबडे कासव - दोन बगळे - मैत्री - तलाव आटणे - दुस-या तलावात जाण्याचा विचार - कासवाने उपाय सुचविणे - बगळ्यांनी काठीच्या मदतीने कासवाला घेऊन जाणे - कासवाचे मधेच बडबडणे - उंचावरून खाली पडणे - परिणाम.
(2) लोभी माणूस - देवाची भक्ती - प्रसन्न - सोन्याची मागणी - झोळीत सोने - "खाली पडले तर माती होईल" - झोळी भरते - जड होऊन फाटते - सगळी माती होणे.

**(ख) खालील उतारा वाचून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे स्वतःच्या भाषेत लिहा :**

एके दिवशी कलाम चर्चमध्ये आपल्या टेबलापाशी बसून काम करत असताना त्यांना अंतराळ विभागातील एका उच्च अधिका-याकडून अनपेक्षित फोन आला, जेव्हा कलाम त्या अधिका-याबरोबर बोलले, तेव्हा त्याने कलाम यांना एक शुभवार्ता ऐकवली की डॉ.विकम साराभाई यांनी त्यांची व काही अन्य भारतीय वैज्ञानिकांची साऊंडिंग रॉकेटविषयी सहा महिन्यांच्या प्रशिक्षणाकरता अमेरिकेतील 'नासा' या संस्थेत जाण्यासाठी निवड केली होती. अमेरिकेला जाण्यापूर्वी काही दिवस आपल्या कुटुंबासमवेत राहण्याकरिता कलाम रामेश्वरम्ला गेले. त्यांच्या घरातील प्रत्येक व्यक्तीला कलाम यांची 'नासा' कार्यकमासाठी निवड झाली, याचा अभिमान वाटत होता. ज्या दिवशी ते न्यूयॉर्कला जाण्यासाठी मुंबईमध्ये विमानात बसण्यासाठी निघणार होते, त्या दिवशी घरातले वातावरण भावूक होते. त्यांच्या आई-वडिलांनी त्यांना आशीर्वाद दिला. मित्रांनी त्यांना अधून मधून पत्र पाठवत राहायला सांगितले.

अब्दुल कलामांचे मेहुणे जलालुद्दीन आणि चुलत भाऊ समसुद्दीन त्यांना निरोप देण्याकरिता मुंबईला गेले.

**प्रश्न :**

(1) उच्च अधिका-याने कलामांना कोणती शुभवार्ता ऐकवली ? **2**

(2) कलाम रामेश्वरम्ला का गेले ? **1**

(3) कलाम यांना निरोप देण्यासाठी मुंबईला कोण कोण गेले ? **1**

**प्र. 9. खालीलपैकी कोणतेही एक पत्र लिहा : 4**

(1) अनिल/अनिता देसाई, विलेपार्ले, मुंबई-५७, येथून विद्युत भारनियमनासंबधी मुख्य अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ यांना तकार करणारे पत्र लिहितो/लिहिते.

**किंवा**

(2) अक्षय /अक्षता परब, जनकपुरी, नाशिक, हा /ही इयत्ता दहावीनंतर काय करायचे ठरविले आहे, त्याची माहिती मोठ्या भावास पत्राने कळवतो /कळवते.

**किंवा**

तुमच्या शाळेत साज-या झालेल्या दहावीच्या विद्यार्थ्यांच्या निरोप समारंभाचा वत्तान्त लिहा.

**किंवा**

योगशिबिराची जाहिरात तयार करा.

❑❑❑❑

---

# MARATHI

**[ OCTOBER - 2009 ]**

**Time : 3 Hours** **Marks : 80**

---

**प्र. 1. खालीलपैकी कोणत्याही तीन प्रश्नांची उत्तरे सुमारे 30 ते 40 शब्दांत लिहा : 12**

(1) दिनू आणि दामू परस्परांच्या कोणत्या तक्रारी आईजवळ करीत आहेत ?

(2) आईने गाव हळदीकुंकू का केले ?

(3) हरिहररावांनी कोणते कार्य केले ?

(4) आपला मुलगा पास झाल्याचा आनंद आक्का का व्यक्त करत नव्हती ?

(5) सावित्रीबाई फुले यांची राहणी कशी होती ?

**प्र. 2. (क) खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात लिहा : 4**

(1) वीजबाईला कशाची आवड आहे ?

(2) शत्रुसेनेचे जम्मू भागातील आक्रमण थोपविण्याची जबाबदारी कोणावर सोपविण्यात आली होती ?

(3) अमीरच्या वडिलांकडे कोणाची रीघ लागलेली असे ?

(4) मुले माळ्याखाली केव्हा उभी राहत ?

**(ख) पाठ्यपुस्तकांतील गद्यपाठांच्या आधारे खालील वाक्यांतील रिकाम्या जागी योग्य शब्द भरून ती वाक्ये पुन्हा लिहा : 3**

(1) बांबूच्या वनातला वारा ............ असा शीळ घालत येतो.

(2) "भास्कर, आजपासून तू रोज ............ चारायला माळावर जा."

(3) सावित्रीबाई तात्यांना ............ म्हणत.

**(ग) खालील वाक्ये कोणी कोणास म्हटली ते लिहा : 3**

(1) "वीजबाई तुला कोणते रूप देऊ?"

(2) "अरे, शेताचा कब्जा तर तुला मिळाला ना ?"

(3) "पुढच्या वर्षी आपण नवीनच घर बांधून टाकू."

**प्र. 3. खालीलपैकी कोणत्याही तीन प्रश्नांची उत्तरे सुमारे 30 ते 40 शब्दांत लिहा : 12**

(1) 'काय करूं आतां धरुनिया भीड' या अभंगातून संत तुकाराम यांनी कोणता उपदेश केला आहे ?

(2) रणांगणावर जाणा-या मुलाच्या आईच्या भावना 'निरोप' या कवितेतून कशा व्यक्त झाल्या आहेत ?

(3) 'संघर्ष' या कवितेतून श्रमिकांनी काय करावे असे कवीला वाटते ? का ?

(4) 'शब्दशस्त्र' या कवितेतून शब्दांचे महत्त्व कवयित्रीने कसे पटवून दिले आहे ?

(5) 'श्वास' या कवितेत कवीने पावसाची आराधना कोणत्या शब्दांत केली आहे ?

**प्र. 4. (क) खालीलपैकी कोणत्याही एका काव्यपंक्तीचा संदर्भासह सरळ अर्थ लिहा : 3**

(1) सर्व काही देता यावे, श्रेय राहू नये हाती;
यावी लाविता कपाळी भक्तिभावनेने माती.

(2) गुरु हा सुखाचा सागरु। गुरुहा प्रेमाचा आगरु।
गुरुहा धैर्याचा डोंगरु। कदाकाळीं डळमळीना।

**(ख) खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात लिहा : 3**

(1) विठ्ठल कशाचा धनी आहे ?

(2) मांजाचे धागे कशासाठी घोटले गेले ?

(3) कवीने कशाचा वसा घेतला आहे ?

**प्र. 5. खालीलपैकी कोणत्याही दोन प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी 40 ते 50 शब्दांत लिहा : 8**

(1) ज्यूलिया लंडनला गेल्यानंतर क्षितींद्रची मनःस्थिती कशी झाली ?

(2) आजोबांनी दिलेले फूल आजीला दिल्यावर आजीने काय केले ?

(3) गणपा रावसाहेबांकडे कशासाठी आला होता ?

(4) बाईंचे लग्न ठरल्यावर प्रीतमने त्यांना काय देऊ केले ? का ?

**प्र. 6. खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे सुमारे 150 शब्दांत निबंध लिहा : 10**

(1) **शेतक-यांचे आत्मवृत्त :**
**मुद्दे :** नाव - गाव - शिक्षण - शेतीच्या कामाची लहानपणापासून सवय - दिवसभर शेतात

राबणे - अनियमित पाऊस - रेडिओ, दूरदर्शन वरील माहितीचा उपयोग - नवे शोध - उत्पादनाची तंत्रे - औषधे, बी, अवजारे - नवी पिढी सुशिक्षित - शेती करायला तयार नाही. काही अपेक्षा.

(2) **माझे आवडते शिक्षक :**

**मुद्दे :** शिक्षकांचे नाव - विषय - शिक्षक आवडण्याची कारणे - त्यांचे गुण, स्वभाव - विद्यार्थ्यांना मदत करण्याची वृत्ती - शिकवण्याची हातोटी - त्यांच्या बद्दल प्रेम व आदराची भावना - त्यांचे आपल्या जीवनातील स्थान.

(3) **आई संपावर गेली तर !**

**मुद्दे :** हा विचार मनात केव्हा व कसा आला ? - घरात उडणारा गोंधळ - शाळेत जायला उशीर - अपूर्ण गृहपाठ - घरातील कामांमुळे अभ्यासाकडे दुर्लक्ष - शाळेतून आल्यावर जेवण तयार नसणे - घराचे घरपण नाहीसे होणे - घरातील प्रत्येकाचे वैतागणे - आईने संपावर न जाणे चांगले.

(4) **छंद माझा वेगळा :**

**मुद्दे :** छंद म्हणजे काय ? छंदाची आवश्यकता - विविध छंद - छंद कसा निर्माण झाला ? - छंद कसा जोपासला - छंदामुळे झालेले फायदे - छंदापासून मिळणारा आनंद, विरंगुळा.

**प्र. 7. (क) कंसातील सूचनेप्रमाणे बदल करून शब्द पुन्हा लिहा (कोणतेही चार) : 2**

(1) लेखक, पक्षी, सासरा (स्त्रीलिंगी रूपे लिहा)

(2) पत्नी, लांडोर, मामी (पुल्लिंगी रूपे लिहा)

**(ख) कंसातील सूचनेप्रमाणे वाक्यांत बदल करून वाक्ये पुन्हा लिहा : (कोणतीही दोन) 2**

(1) तो परीक्षेत पहिला आला. (प्रश्नार्थक करा)

(2) किती सुंदर बाग आहे ही ! (विधानार्थी करा)

(3) मुलांनी चांगला अभ्यास केला. (आज्ञार्थी करा)

(4) ही मुलगी फार हुशार आहे. (उद्गारार्थी करा)

**(ग) खालीलपैकी कोणतेही एक वाक्य लेखननियमांनुसार शुद्ध करून लिहा : 2**

(1) आमची कहानी लहान, तुमची हरो भुक तहान.

(2) आइ मुकाट्याने उठली व गोरीपुढे गेली.

**(घ) खाली वाक्प्रचार व वाक्ये दिलेली आहेत. योग्य वाक्प्रचारांचा योग्य वाक्यात उपयोग करून ती वाक्ये पुन्हा लिहा (कोणतीही चार) : 4**

(पांगापांग होणे, चामडी लोळवणे, खपवून टाकणे, मानाचा मुजरा करणे, रीघ लागणे, धीर येणे)

(1) उरलेलं पन्हं राजूने संपवून टाकलं.

(2) सभा संपल्यावर सर्व लोक निघून गेले.

(3) ‘भव्य सेल’ अशी पाटी पाहून दुकानासमोर लोकांची रांग लागली.

(4) दरोडेखोर सापडताच लोकांनी त्यांना खूप मार दिला.

(5) दहावीच्या परीक्षेसाठी माझा परीक्षा क्रमांक माझ्याच शाळेत आल्यामुळे माझी भीती कमी झाली.

(6) युद्धात शौर्य दाखविणा-या जवानांचा भारत सरकार परमवीर चक्र बहाल करून गौरव करते.

**प्र. 8. (क) खाली दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे कोणतीही एक गोष्ट लिहा व शीर्षक देऊन तात्पर्य लिहा : 4**

**मुद्दे :** एक टोपी विकणारा - गावात येणे - दुपारची वेळ - एका झाडाखाली विश्रांती - टोप्यांची पेटी बाजूला ठेवून जेवणे - जवळच्या नदीवर पाणी पिणे - झोपणे - सर्व टोप्या नाहीशा - टोप्या माकडांनी नेणे - टोप्या मिळविण्यासाठी केलेली युक्ती - आपल्या डोक्यावरची टोपी जमिनीवर फेकणे - माकडांचे तसे करणे - टोप्या परत मिळणे - निघून जाणे - तात्पर्य.

**किंवा**

**मुद्दे :** दुपारची वेळ - सिंह जंगलात झोपलेला - उंदराचे अंगावर उड्या मारणे - सिंहाची झोपमोड होणे - हळूच पंजात पकडणे - दयेची याचना करणे - पुढे तोच सिंह शिका-याच्या जाळ्यात अडकणे - सिंह गर्जना - त्याच उंदराचे धावत जाणे - दातांनी जाळे कुरतडणे - उपकाराची फेड उपकारानेच - तात्पर्य.

**(ख) खालील उतारा वाचून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे स्वतःच्या भाषेत लिहा :**

तुम्ही ज्या पाच क्षेत्रांची निवड केली आहे. त्यामध्ये आणखी एका गोष्टीचा अंतर्भाव तुम्ही करा. ती गोष्ट म्हणजे देवावरची श्रद्धा ! शिवाय नागरिकांचा अध्यात्माच्या मार्गातून विकास करा. हे फार महत्त्वाचे आहे. अध्यात्म आणि चैतन्य शक्तिच्या माध्यमातून लोकांना प्रोत्साहित करा. त्यातून एक पवित्र वातावरण तयार होईल. या शिवाय आज हिंसा आणि भ्रष्टाचाराची जी वाढती भावना आहे तिला आळा बसेल. नीतिमत्तेने वागणारे आणि देवावर श्रद्धा असणारे नागरिक आज आपल्याला हवे आहेत. त्यासाठी त्यांच्या ठायी सध्या सुप्त असलेला विश्वास जागृत करायला हवा. त्यातून सगळं सुरळीत होईल. आपले प्रश्न सुटतील आणि आपली स्वप्नं साकार होतील.

**प्रश्न :**

(1) हिंसा आणि भ्रष्टाचाराला आळा कसा बसेल ? **2**

(2) कोणत्या मार्गातून नागरिकांचा विकास होईल ? **1**

(3) आज आपल्याला कसे नागरिक हवे आहेत ? **1**

**प्र. 9. खालीलपैकी कोणतेही एक पत्र लिहा : 4**

(1) स्नेहल/स्नेहा टाकळे, 11 इंद्रपुरी, डहाणूकर कॉलनी, श्रीरामपूर हा/ही नगराध्यक्ष, श्रीरामपूर नगरपालिका यांना पत्र लिहून आपल्या शाळेसमोरील रस्ता नादुरुस्त असल्याची तक्रार करतो/करते.

(2) अशोक माळी, स्नेह कुंज, मुरादपूर, रत्नागिरी - 2 येथून आपली लहान बहीण जयश्री माळी, पारिजात - 7, मुलुंड-मुंबई - 81 ला पत्र पाठवून तिचा चित्रकला स्पर्धेत प्रथम क्रमांक आला म्हणून अभिनंदन करणारे पत्र लिहितो.

**किंवा**

तुमच्या शाळेत साजरा केलेल्या वृक्षारोपण दिंडीचा वृत्तान्त तयार करा.

**किंवा**

संगणक वर्गाची जाहिरात तयार करा.

❑❑❑❑

**प्र.9. खालीलपैकी कोणतेही एक पत्र लिहा :** **4**

(1) स्नेहल/स्नेहा टाकळे, 11 इंद्रपुरी, डहाणूकर कॉलनी, श्रीरामपूर हा/ही नगराध्यक्ष, श्रीरामपूर नगरपालिका यांना पत्र लिहून आपल्या शाळेसमोरील रस्ता नादुरुस्त असल्याची तक्रार करतो/करते.

(2) अशोक माळी, स्नेह कुंज, मुरादपूर, रत्नागिरी - 2 येथून आपली लहान बहीण जयश्री माळी, पारिजात - 7, मुलुंड-मुंबई - 81 ला पत्र पाठवून तिचा चित्रकला स्पर्धेत प्रथम क्रमांक आला म्हणून अभिनंदन करणारे पत्र लिहितो.

**किंवा**

तुमच्या शाळेत साजरा केलेल्या वृक्षारोपण दिंडीचा वृत्तान्त तयार करा.

**किंवा**

संगणक वर्गाची जाहिरात तयार करा.

❑❑❑❑

---

# MARATHI

**[ MARCH - 2010 ]**

**Time : 3 Hours** **Marks : 80**

**प्र.1. खालीलपैकी कोणत्याही तीन प्रश्नांची उत्तरे सुमारे 30 ते 40 शब्दांत लिहा :** **12**

(1) चाफ्याच्या झाडाबद्दल लेखक गुलजार यांनी काय म्हटले आहे ?
(2) मुलीला सोडून जाताना बाला रडू का आले ?
(3) मेघांची कोणकोणती कुळे झाली ?
(4) 'अमीर' या पाठातून अमीरचे कोणते स्वभावविशेष लक्षात येतात ?
(5) आडाच्या दिशेने चालू लागल्यावर लेखकाच्या मनात कोणते विचार आले ?

**प्र.2. (क) खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात लिहा :** **4**

(1) हरिहररावांचा जन्म कुठे झाला ?
(2) राजू आईबरोबर का जात असे ?
(3) भास्कर खाँसाहेबांकडे कशासाठी आला होता ?
(4) होस्टेलवर जनाबाई गि-हे यांचा नंबर कुणी लावला होता ?

**(ख) पाठ्यपुस्तकांतील गद्यपाठांच्या आधारे खालील वाक्यांतील रिकाम्या जागी योग्य शब्द भरून ती वाक्ये पुन्हा लिहा :** **3**

(1) मी बेलिफांकडून कोर्टाचा आदेश आणि ............ घेतली.
(2) तुला वाटेल तर ............ जाऊन बैस.
(3) स्वतः राणे पायाला गोळी लागून ............ झाले होते.

**(ग) खालील वाक्ये कोणी कोणास म्हटली ते लिहा :** **3**

(1) "बरोबर काय न्यायचे आहे ?"
(2) "तुला कोणते रूप देऊ?"
(3) "चटकन पाणी घेऊन ये आडाचं."

**प्र.3. खालीलपैकी कोणत्याही तीन प्रश्नांची उत्तरे सुमारे 30 ते 40 शब्दांत लिहा :** **12**

(1) गुरूचे माहात्म्य संत ज्ञानेश्वर यांनी कसे वर्णन केले आहे ?
(2) 'निरोप' या कवितेतून आईने कोणत्या भावना व्यक्त केल्या आहेत ?
(3) आत्मसन्मानाने जगण्यासाठी कवीने कोणता मार्ग सांगितला आहे ?

(4) कवीने पावसाची आराधना का केली आहे ?
(5) 'तहान' या कवितेत आपली इच्छा पूर्ण होण्यासाठी कवी स्वतःमध्ये कोणते बदल घडवू इच्छितात ?

**प्र.4. (क) खालीलपैकी कोणत्याही एका काव्यपंक्तीचा संदर्भासह सरळ अर्थ लिहा : 3**
(1) बांधियलें ब्रीद तोडर चरणीं। त्रैलोक्याचा धणी पंढरीये।।
(2) ज्योत ज्योतीने जागवा करा प्रकाश सोहळा
इवल्याशा पणतीने होई काळोख पांगळा

**(ख) खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात लिहा : 3**
(1) शब्दांना कशाचे पाते फुटावे असे कवयित्रीला वाटते ?
(2) हरीच्या हाती काय आहे ?
(3) वाणीने कशासाठी शस्त्र व्हावे ?

**प्र.5. खालीलपैकी कोणत्याही दोन प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी 40 ते 50 शब्दांत लिहा : 8**
(1) 'अंगठा' या कथेतून कोणता बोध होतो ?
(2) क्षितींद्रचा जूलियाशी सहवास कसा वाढला ?
(3) पहाटे जाग आल्यावर लंपनला काय समजेनासे झाले ?
(4) प्रीतमच्या घरच्या परिस्थितीचे वर्णन लेखिका माधुरी शानभाग यांनी कसे केले आहे ?

**प्र.6. खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे सुमारे 150 शब्दांत निबंध लिहा : 10**
(1) **निसर्ग माझा सोबती :**
**मुद्दे :** मानव निसर्गाचा घटक - निसर्गाचे रक्षण प्रथम कर्तव्य - दुर्लक्ष केले तर पृथ्वीचा नाश - रक्षण केले तर मानव वाचेल - खऱ्या अर्थाने सोबती - जीवन आनंदी - निसर्ग वाचवा पृथ्वी वाचेल - पर्यावरण संतुलन - निसर्गाशी मैत्री टिकवा.
(2) **माझे बाबा :**
**मुद्दे :** मुलांमध्ये रमणारे - सर्वांच्या भावना, गरजा ओळखणारे - मित्रासारखे वागणारे - परोपकारी - लोकमित्र - मोठ्या मनाचे - माझा आदर्श.
(3) **एका निवृत्त सैनिकाचे आत्मवृत्त :**
**मुद्दे :** परिचय - सेनादलात जावेसे का वाटले ? - केव्हा भरती झाली - प्रशिक्षण - प्रत्यक्ष युद्ध - रोमांचक अनुभव - कामगिरीचा आनंद - कौतुक - सध्याचे जीवन - काय वाटते.
(4) **वीज बंद झाली तर :**
**मुद्दे :** विजेचे दैनंदिन जीवनातील स्थान - वीज बंद पडली तर होणारा अनर्थ - मानवी जीवनावर होणारा परिणाम - जगाचा विकास थांबेल - ही कल्पनाच नको.

**प्र.7. (क) कंसातील सूचनेप्रमाणे बदल करून शब्द पुन्हा लिहा (कोणतेही चार) : 2**
(1) गोरा, पाटील, म्हातारा (स्त्रीलिंगी करा)
(2) भगिनी, गाय, माय (पुल्लिंगी करा)

**(ख) कंसातील सूचनेप्रमाणे वाक्यांत बदल करून वाक्ये पुन्हा लिहा : (कोणतीही दोन) 2**
(1) हे वर्डबुक खूप खराब झाले. (उद्गारार्थी करा)
(2) आता नवीन घर बांधावे (आज्ञार्थी करा)
(3) मी आता काहीही करू शकत नाही. (प्रश्नार्थी करा)
(4) वा, काय उपमा आहे ! (विधानार्थी करा)

**(ग) खालीलपैकी कोणतेही एक वाक्य लेखननियमांनुसार शुद्ध करून लिहा : 2**
(1) ऋषीचे कुळ आणि नदिचे मूळ शोधू नये.
(2) जिवनाच्या प्रवासात कीती तरी माणसे भेटतात.

**(घ) खाली वाक्प्रचार व वाक्ये दिलेली आहेत. योग्य वाक्प्रचाराचा योग्य वाक्यात उपयोग करून ती वाक्ये पुन्हा लिहा (कोणतीही चार) :** **4**

(भीड धरणे, पायपीट करणे, विलीन होणे, उसंत न मिळणे, मानाचा मुजरा करणे, शिरकाव करणे)

(1) स्वातंत्र्यप्राप्तीनंतर अनेक संस्थाने भारतात मिसळून गेली.

(2) अन्यायाविरूद्ध बोलताना संकोच बाळगू नये.

(3) सीमेचे रक्षण करणा-या जवानांना आपण आदराने वंदन केले पाहिजे.

(4) कामाच्या गडबडीत आईला कधी मोकळा वेळ मिळतच नाही.

(5) लोकांची पत्रे वाटण्यासाठी पोस्टमनला खूप चालावे लागते.

(6) भिंतीला भगदाड पाडून चोरांनी दुकानात प्रवेश केला.

**प्र.8. (क) खाली दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे कोणतीही एक गोष्ट लिहा व शीर्षक देऊन तात्पर्य लिहा :** **4**

**मुद्दे :** रामा - हुशार व स्वाभिमानी - आजार - सहामाही परीक्षेत नापास - वर्गात अपमान - जिद्दीने अभ्यास - शालांत परीक्षेत पहिला - शाळेकडून कौतुक.

**किंवा**

**मुद्दे :** एक सैनिक - लढाईवर असताना शत्रूकडून कैद - तुरूंगात हाल सहन करणे - सुटका - रस्त्यात पोपट विकणारा - पोपटांचे सर्व पिंजरे खरेदी करून सर्व पोपटांना सोडून देणे - पोपट विकणारा आश्चर्यचकित - कारण विचारणे - सैनिकाने खुलासा करणे - स्वातंत्र्याचे महत्त्व - तात्पर्य.

**(ख) खालील उतारा वाचून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे स्वतःच्या भाषेत लिहा :**

सांदीपनींच्या आश्रमातील विद्यार्थी पाणी भरीत, लाकडे फोडीत, जंगलात जाऊन मोळ्या आणीत. हा श्रीमंत विद्यार्थी व हा गरीब असा भेद नसे. गरीब सुदामा व सुखी कृष्ण रानांत बरोबर जात. गुरूजवळ सारे समान, सारे श्रम करीत. गरिबांचे काय, श्रीमंतांचे काय, शरीर निरोगी हवे. आरोग्य सर्वांना हवे. प्राचीन भारतीय आश्रमात विद्यार्थी व विद्यार्थिनी यांना काटक बनविण्यात येई. थंडी असो, वारा असो, ऊन असो, पाऊस असो त्यांची त्यांना चिंता वाटत नसे. अंगाला वारा लागला पाहिजे, ऊन लागले पाहिजे. पाऊस पडू लागला म्हणजे मुलांना सुट्टी द्यावीं, असे मनुस्मृतीत सांगितले आहे.

**प्रश्न :**

(1) सांदीपनींच्या आश्रमातील विद्यार्थी कोणती कामे करीत ? **2**

(2) विद्यार्थी व विद्यार्थिनी यांना कशाची चिंता वाटत नसे ? **1**

(3) मनुस्मृतीत काय सांगितले आहे ? **1**

**प्र.9. खालीलपैकी कोणतेही एक पत्र लिहा :** **4**

(1) गौरव/गौरी गोडबोले, प्लॉट नं. 4, उद्यम नगर, कोल्हापूर येथून आरोग्य विभाग अधिकारी, कोल्हापूर, महानगरपालिका यांना आपल्या विभागात ब-यांच दिवसापासून कचरापेटी साफ न केल्यामुळे होणारी नागरिकांची गैरसोय कळविणारे तक्रार वजा पत्र लिहितो/लिहिते.

(2) सुरेश/सुप्रिया जोशी, शांती निवास, 42 केशरबाग, त्र्यंबक रोड, नाशिक - 2 येथून मित्र/मैत्रिण उमेश/उमा पाटील, पारिजात 7, मुलुंड, मुंबईला पत्र पाठवून धरमतरची खाडी पोहण्याच्या स्पर्धेत राज्य पातळीवर पहिला/पहिली आल्याबद्दल त्याचे/तिचे अभिनंदन करतो/करते.

**किंवा**

**खाली दिलेल्या विषयावर वृत्तान्त लिहा :**

तुमच्या शाळेत साजरा करण्यात आलेल्या वृक्षारोपणाचा वृत्तान्त लिहा.

**किंवा**

**खाली दिलेल्या विषयावर जाहिरात तयार करा :**

‘छंदवर्गाची’ जाहिरात तयार करा.

❑❑❑❑

# MARATHI

**[ OCTOBER - 2010 ]**

**Time : 3 Hours** **Marks : 80**

**प्र.1. खालीलपैकी कोणत्याही तीन प्रश्नांची उत्तरे सुमारे 30 ते 40 शब्दांत लिहा : 12**

(1) सेकंड लेफ्टनंट राणे यांनी सुरुंग निकामी करण्यासाठी कोणते साहस केले ?
(2) चैत्रातल्या हळदीकुंकवाची तयारी कशी सुरू होई ?
(3) 'अमीर, मनाचाही तू अमीर आहेस' असे लेखक का म्हणतात ?
(4) ज्योत्स्ना कदम यांच्या घरात कोणत्या अडचणी होत्या ?
(5) सावित्रीबाई फुले यांची राहणी कशी होती ?

**प्र.2. (क) खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात लिहा : 4**

(1) बहावा आणि चिनार वृक्ष बघताना लेखकाला काय वाटते ?
(2) हरिहररावांचे कोणत्या गोष्टींशी सघन नाते होते ?
(3) विद्येची किंमत कशामुळे कमी होते ?
(4) जनाबाई गि-हे यांना पाठविण्यासाठी महिनाभरात वडिलांकडे किती रुपये जमा होत ?

**(ख) पाठ्य-पुस्तकातील गद्यपाठाच्या आधारे खालील वाक्यांतील रिकाम्या जागी योग्य शब्द भरून ती वाक्ये पुन्हा लिहा : 3**

(1) काशीची ............. रामेश्वराला जाते.
(2) मी किडा होणार नाही तर ............. होईन.
(3) तीच ............. माय भगुन्यावर झाकन म्हणून ठिवायची.

**(ग) खालील वाक्ये कोणी कोणास म्हटली ते लिहा : 3**

(1) "मला रूपाची आवड नाही, गुणांची आवड आहे."
(2) "आजपासून तू रोज शेळ्या चारायला माळावर जा."
(3) "चटकन पाणी घेऊन ये आडाचं."

**प्र.3. खालीलपैकी कोणत्याही तीन प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी सुमारे 30 ते 40 शब्दांत लिहा : 12**

(1) 'धन्य यशोदा ते माय' असे संत जनाबाई का म्हणतात ?
(2) बालविश्वातील खेळण्यांचे महत्त्व कवीने कसे विशद केले आहे ?
(3) आपल्या इच्छा पूर्ण होण्यासाठी कवी म. म. देशपांडे स्वतःमध्ये कोणते बदल घडवू इच्छितात ?
(4) 'अंधार पखाली' या कवितेत कवीने कोणता विचार मांडला आहे ?
(5) आत्मसन्मानाने जगण्यासाठी कवी रविचंद्र हडसनकर यांनी कोणता मार्ग सांगितला आहे ?

**प्र.4. (क) खालीलपैकी कोणत्याही एका काव्यपंक्तीचा संदर्भासह अर्थ लिहा : 3**

(1) धन्य करी माझी कूस येई विजयी होऊन,
पुन्हा माझिया हाताने दूधभात भरवीन !
(2) गुरु हा संतकुळीचा राजा। गुरु हा प्राणविसावा माझा।
गुरुवीण देव दुजा। पाहतां नाहीं त्रिलोकीं।।

**(ख) खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात लिहा : 3**

(1) तळहातावर काय उगवू दे असे कवयित्री उषाकिरण आत्राम यांना वाटते ?
(2) 'श्वास' या कवितेत कवीने दयाघनाला कोणता प्रश्न विचारला आहे ?
(3) श्रीहरिने वैकुंठ कशासाठी सांडिले ?

**प्र.5. खालीलपैकी कोणत्याही दोन प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी सुमारे 40 ते 50 शब्दांत लिहा : 8**

(1) गणपा रावसाहेबांकडे कशासाठी आला होता ?
(2) क्षितीन्द्रचा जूलियाशी सहवास कसा वाढला ?
(3) प्रीतमच्या घरच्या परिस्थितीचे वर्णन माधुरी शानभाग यांनी कसे केले आहे ?
(4) 'वरातीमागनं घोडं' असे आजी लंपनला का म्हणते ?

**प्र.6. खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे सुमारे 150 शब्दांत निबंध लिहा : 10**

(1) **माझे आजोबा :**
**मुद्दे :** आजी, आजोबांचे जिव्हाळ्याचे नाते - आजोबांचे नातवंडांवरील प्रेम - दुधापेक्षा दुधाच्या सायीला जपणे - आजोबांचे वर्णन - वेशभूषा - राहणी - स्वभाव - आजोबांच्या संदर्भातील एखादी अविस्मरणीय घटना.

(2) **शेतक-याचे आत्मवृत्त :**
**मुद्दे :** मी एक शेतकरी - जन्म - बालपण - परिस्थिती - शिक्षण - कष्ट - उत्पन्न - निसर्गावर अवलंबून - शेतीत नवीन प्रयोग - परिस्थिती सुधारणे - उत्पन्नात वाढ - मुले शिक्षित - समाज आणि सरकारकडून अपेक्षा.

(3) **संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर :**
**मुद्दे :** संतपरंपरा - संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर - जन्म - बालपण - समाजाचा दृष्टिकोन - भाविकांची माऊली - ज्ञानेश्वरी व इतर ग्रंथरचना - अभंग - वारकरी पंथाचा पाया - समाजकार्य - अथक परिश्रम - लाभलेले मोठेपण - समाधी.

(4) **आई संपावर गेली तर ....! :**
**मुद्दे :** मजेशीर कल्पना - मागण्या पूर्ण करण्यासाठी संप - सकाळपासून चहा, जेवण, शाळेची तयारी, अभ्यास, घरकाम भावंडांशी वर्तन - प्रेमाचे शब्द कोण देणार ? जाणवणारी उणीव - परमेश्वरास प्रार्थना - शेवट.

**प्र.7. (क) कंसातील सूचनेप्रमाणे बदल करून शब्द पुन्हा लिहा (कोणतेही चार) : 2**

(1) देव, अभिनेता, कुत्रा (स्त्रीलिंग करा)
(2) सासू, कोवळी, गायिका (पुल्लिंग करा)

**(ख) कंसातील सूचनेप्रमाणे वाक्यांत बदल करून वाक्ये पुन्हा लिहा : (कोणतीही दोन) 2**

(1) मुद्दाम पाय दिला का मी पाटीवर ? (विधानार्थी वाक्य करा)
(2) मला चांगली नोकरी लागेल. (प्रश्नार्थक वाक्य करा)
(3) घरामागे त्यांनी खूप घाण केलीय. (उद्गारवाचक वाक्य करा)
(4) आई, आम्हाला तुझी कहाणी सांगतेस का ? (आज्ञार्थी वाक्य करा)

**(ग) खालीलपैकी कोणतेही एक वाक्य लेखननियमांनुसार लिहा : 2**

(1) भूवयांच्या ठिकाणी इंद्रधनुस्य लपले.
(2) एका जिवनसंग्रामाचा असत झाला.

**(घ) खाली वाक्प्रचार व वाक्ये दिलेली आहेत. योग्य वाक्प्रचारांचा योग्य वाक्यांत उपयोग करून ती वाक्ये पुन्हा लिहा (कोणतीही चार) : 4**

(श्रीमुखात भडकावणे, माघारी जाणे, धाबे दणाणणे, कानांवर विश्वास न बसणे, भान हरपणे, अप्रुप वाटणे)

(1) बक्षिसासाठी मुख्याध्यापकांनी माझे नाव जाहीर केल्यावर मला ते खरेच वाटले नाही.
(2) मुलाच्या तोंडून अपशब्द बाहेर पडताच वडिलांनी त्याच्या थोबाडीत मारली.
(3) ताजमहालाचे सौंदर्य बघताना मी स्वतःला विसरून गेलो.
(4) छोट्या जादूगाराची करामत पाहून आम्हाला त्याचे कौतुक वाटले.
(5) भारतीय सैनिकांनी जोरदार हल्ला करताच, शत्रूचे सैनिक परत गेले.
(6) पोलिसांची गाडी येताच जमाव घाबरला.

**प्र. 8. (क) खालील दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे कोणतीही एक गोष्ट लिहा. शीर्षक देऊन तात्पर्य लिहा : 4**

(1) एक कोल्हा - निळ्या रंगाच्या पाण्याच्या हौदात पडतो - अंग निळे - युक्ती करतो - जंगलात जातो - सर्व प्राण्यांना सांगतो - "देवाने मला तुमचा राजा म्हणून पाठवले आहे" - सर्वांना आनंद - सर्व प्राण्यांचे ओरडणे - ओरडणे ऐकून कोल्ह्याचेही ओरडणे - गुपित उघडकीस येते - पळून जातो.

(2) एक राजा - त्याच्या राज्यातील लोक आळशी - त्यांना उद्योगी बनविण्याचा विचार - रस्त्यात मोठा दगड ठेवतो - त्याखाली लहानशी पिशवी - अनेक लोक बाजूने जातात - दगड तसाच - एक गरीब मनुष्य - दगड बाजूला करतो - दगडाखाली पिशवी - पिशवीत सोन्याची नाणी - 'बक्षीस' अशी चिठ्ठी - लोक उद्योगी बनतात.

**(ख) खालील उतारा वाचून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे स्वतःच्या भाषेत लिहा :**

अगदी प्राथमिक अवस्थेत जेव्हा माणूस होता, तेव्हा तो गुहेत आणि जंगलात राहत होता. त्या वेळी तो इकडे तिकडे भटकायचा, शिकार करायचा. शिकार मिळाली नाही तर रानातली फळे आणि कंदमुळे खाऊन आपली भूक भागवायचा. मात्र हे सर्व दिवसाउजेडी. सूर्यास्तानंतर बाहेर पडण्याचं धाडस तर तो अगदी क्वचितच करायचा. कारण तो अंधाराला भ्यायचा. अंधार म्हणजे त्याच्या लेखी राक्षस होता आणि प्रकाश देणारा सूर्य हा त्याचा देव होता.

असा बराच काळ गेल्यानंतर माणसाला आगीचा शोध लागला. प्रकाश देणारी आणि जीवनाला आधार देणारी आग मग त्याला देवता वाटू लागली.

कारागिरी - संपादिका डॉ. सरोजिनी बाबर

**प्रश्न :**

(1) प्राथमिक अवस्थेत माणूस कोठे राहायचा ? आपली भूक तो कशी भागवायचा ? **2**

(2) प्राथमिक अवस्थेतील माणूस सूर्यास्तानंतर बाहेर का पडत नसे ? **1**

(3) प्राथमिक अवस्थेतील माणूस आगीस देवता का मानू लागला ? **1**

**प्र.9. खालीलपैकी कोणतेही एक पत्र लिहा : 4**

(1) विनय/विनया जोशी, क्रीडाप्रमुख, सरस्वती विद्या मंदिर, बालगंधर्व मार्ग, मलकापूर, जिल्हा बुलढाणा हा/ही टिळक स्पोर्टस्, पुणे ११, यांच्याकडे खेळाच्या साहित्याची मागणी करतो/करते.

(2) वैभव/विशाखा देशमुख, आदर्श विद्यार्थी वसतिगृह, गोरेगाव, मुंबई हा/ही आपला लहान भाऊ गौरव देशमुख, १२९, कमल सदन, शिवाजी नगर, पुणे याला वाचनाचे महत्त्व समजावून देण्यासाठी पत्र लिहीत आहे.

**किंवा**

खाली दिलेल्या विषयावर वृत्तान्त लिहा.

नूतन माध्यमिक विद्यालय, औरंगाबाद या शाळेत इयत्ता दहावीच्या विद्यार्थी-विद्यार्थिनींना देण्यात आलेल्या निरोप समारंभाचा वृत्तान्त लिहा.

**किंवा**

खाली दिलेल्या विषयावर जाहिरात तयार करा :

नवीन सुरू केलेल्या मिठाईच्या दुकानाची जाहिरात तयार करा.

❑❑❑❑

# MARATHI

**[ MARCH - 2011 ]**

**Time : 3 Hours** **Marks : 80**

**प्र.1. खालीलपैकी कोणत्याही तीन प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी सुमारे 30 ते 40 शब्दांत लिहा : 12**

(1) से. ले. राणे यांनी सुरुंग निकामी करण्यासाठी कोणते साहस केले ?

(2) खाँसाहेबांनी भास्करची परीक्षा कोणत्या पद्धतीने घेतली ?

(3) घर पाडण्यापूर्वी ज्योत्स्ना कदम यांच्या भावाने काय तयारी केली ?

(4) कॉलेजमधील इतर मुली व लेखिका यांच्यात कोणकोणत्या बाबतींत फरक होता ?

(5) सावित्रीबाई फुले यांच्या कार्याविषयी कोणती माहिती लेखकाने दिली आहे ?

**प्र.2. (क) खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात लिहा : 4**

(1) धरणीमाता केव्हा हसली ?

(2) लेखकाने आईला आनंदाची कोणती बातमी सांगितली ?
(3) अमीरच्या वडिलांकडे कोणाची रीघ लागलेली असे ?
(4) हरिहररावांचा जन्म कुठे झाला ?

**(ख) पाठ्य-पुस्तकातील गद्यपाठाच्या आधारे खालील वाक्यांतील रिकाम्या जागी योग्य शब्द भरून ती वाक्ये पुन्हा लिहा : 3**

(1) पळून गेलास, नाहीतर दाखवला असता ............. चांगला इंगा !
(2) नाईकांचे ............. गावात फार प्रसिद्ध होते.
(3) सावित्रीबाई तात्यांना ............. म्हणत.

**(ग) खालील वाक्ये कोणी कोणास म्हटली ते लिहा : 3**

(1) "पुढच्या वर्षी आपण नवीनच घर बांधून टाकू."
(2) "माही पोर गरिबाची हाय. नसंल-असलं ध्यान दिवा."
(3) "ये बेटा, दारात उभा का ?"

**प्र.3. खालीलपैकी कोणत्याही तीन प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी सुमारे 30 ते 40 शब्दांत लिहा : 12**

(1) भक्तांवरील प्रेमासाठी विठ्ठल कोणकोणत्या गोष्टी करतो ?
(2) कवी अनिल यांचे मन बाळखेळण्यांतून का निघत नाही ?
(3) रणांगणावर जाणा-या मुलाच्या आईच्या भावना 'निरोप' या कवितेतून कशा व्यक्त झाल्या आहेत ?
(4) 'अंधार पखाली' या कवितेत कवीने कोणते प्रश्न उपस्थित केले आहेत ?
(5) शब्दांचे महत्त्व कवयित्रीने कसे पटवून दिले आहे ?

**प्र.4. (क) खालीलपैकी कोणत्याही एका काव्यपंक्तीचा संदर्भासह अर्थ लिहा : 3**

(1) पायीं पैंजण आणि वाळे । हातीं नवनीताचे गोळे ।।
(2) याच विक्रमी बाहूंनी स्वतंत्रता राखायाची,
खांद्यावरी या विसावे शांति उद्याच्या जगाची.

**(ख) खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात लिहा : 3**

(1) दुःख मापण्यासाठी कवी म. म. देशपांडे यांना काय हवे आहे ?
(2) 'संघर्ष' या कवितेत कवीच्या मते वाणीने कशासाठी शस्त्र व्हावे ?
(3) कवी रविचंद्र हडसनकर यांनी घेतलेला वसा कशाचा आहे ?

**प्र.5. खालीलपैकी कोणत्याही दोन प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी सुमारे 40 ते 50 शब्दांत लिहा : 8**

(1) जूलियाचे व्यक्तिचित्र तुमच्या शब्दांत रेखाटा.
(2) पहाटे जाग आल्यावर लंपनला काय समजेनासे झाले ?
(3) गणपा रावसाहेबांकडे कशासाठी आला होता ?
(4) प्रीतमच्या घरच्या परिस्थितीचे वर्णन माधुरी शानभाग यांनी कसे केले आहे ?

**प्र.6. खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे सुमारे 150 शब्दांत निबंध लिहा : 10**

(1) **बाबा आमटे - एक आधुनिक संत :**
**मुद्दे :** महाराष्ट्राची प्राचीन संतपरंपरा - संतांचे कार्य - थोडक्यात परिचय - जनजागरण - समाजसुधारणा - बाबा आमटे - एक थोर समाजसेवक - संतांप्रमाणे विरक्त, निस्पृह - आनंदवनाची निर्मिती - टीका सहन करून ध्येयपूर्ती - संपूर्ण कुटुंबाचा या कार्यात सहभाग.

(2) **पिंज-यातील पोपटाचे आत्मवृत्त :**
**मुद्दे :** पूर्वीचे आनंदाचे दिवस - एका फासेपारध्याने पकडले - त्याने अनेक पक्षी पकडले होते - पोपटाची एका श्रीमंताकडे विक्री - पिंज-यात ठेवणे - गुलामगिरीचे दिवस - दुःख.

(3) **मी पाहिलेला अपघात :**
**मुद्दे :** अपघात कोठे झाला ? - अपघात केव्हा झाला ? - अपघात कसा झाला ? - कोणला झाला ? - अपघातस्थळाचे दृश्य - जमाव - तुमचे कार्य - पोलीस - परिणाम - बोध.

(4) **पृथ्वी बोलू लागली तर ...... ! :**
**मुद्दे :** पृथ्वीचा जन्म - मानवाला उपयोग - माणसांची स्वार्थी, संकुचित वृत्ती - त्यामुळे पृथ्वीला वाटणारे दुःख - पृथ्वीचा मानवाला उपदेश - माणसाकडून उपेक्षा - मानवाचा पश्चाताप.

**प्र.7. (क) कंसातील सूचनेप्रमाणे बदल करून शब्द पुन्हा लिहा (कोणतेही चार) : 2**

(1) दास, हत्ती, वकील (स्त्रीलिंगी करा)
(2) मालकीण, हरिणी, बालिका. (पुल्लिंगी करा)

**(ख) कंसातील सूचनेप्रमाणे वाक्यांत बदल करून वाक्ये पुन्हा लिहा : (कोणतीही दोन) 2**

(1) प्रश्नांचे ओझे फार मोठे आहे. (उद्गारवाचक वाक्य करा)
(2) तिला ड्रेस देऊन टाकावा, अशी माझी इच्छा आहे. (प्रश्नार्थक वाक्य करा)
(3) त्या झाडांशी बोललं पाहिजे. (प्रश्नार्थक वाक्य करा)
(4) ही ज्योत किती सुंदर आहे ! (वाक्याचा प्रकार ओळखा)

**(ग) खालीलपैकी कोणतेही एक वाक्य लेखननियमांनुसार लिहा : 2**

(1) देवाचि करणी अन् नारळात पानी.
(2) फुटलेला आवाझ पूर्ण सुधारलेला नव्हता.

**(घ) खाली वाक्प्रचार व वाक्ये दिलेली आहेत. योग्य वाक्प्रचारांचा योग्य वाक्यांत उपयोग करून ती वाक्ये पुन्हा लिहा (कोणतीही चार) : 4**

(घाम गाळणे, तोंड वाजवणे, नशीब उजाडणे, माधुकरी मागणे, काळाने पडद्याआड नेणे, भान हरपणे)

(1) पूर्वीच्या काळी गरीब विद्यार्थी शिक्षणाच्या काळात घरोघरी फिरून अन्न आणून पोट भरीत.
(2) स्वातंत्र्यानंतर झालेल्या फाळणीमुळे उसळलेल्या दंगलीत अनेक तरुण माणसे मरण पावली.
(3) डॉ. बाबसाहेब आंबेडकर यांच्या प्रयत्नांमुळे दलित समाजाची परिस्थिती सुधारली.
(4) निसर्गातली रंगांची उधळण बघताना मी स्वतःला विसरून गेलो.
(5) शेतात खूप कष्ट करून शेतकरी मोत्याचे पीक काढतो.
(6) वडीलधा-या व्यक्तींसमोर वाटेल तसे बोलणे योग्य नव्हे.

**प्र. 8. (क) खालील दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे कोणतीही एक गोष्ट लिहा. शीर्षक देऊन तात्पर्य लिहा : 4**

(1) एक वृद्ध शेतकरी - चाणाक्ष - शेतात आंब्याची रोपे लावणे - तेथून राजाचे आगमन - आश्चर्य - 'या झाडांची फळे तुला कशी खायला मिळणार ?' राजाचा प्रश्न 'मी ज्या झाडांचे आंबे आज खातो ती मी लावलेली नाहीत' शेतक-याचे उत्तर - राजाला आनंद - मोहरांची थैली बक्षीस - तात्पर्य.
(2) शाळेतील मुले - सुट्टीच्या दिवशी तलावाच्या काठी - पाण्यात दगड मारणे - पुष्कळ बेडूक जखमी - एक म्हातारा बेडूक मुलांना विचारतो, 'तुम्ही काय करता ?' 'आम्ही खेळ खेळतो.' "तुमचा खेळ होतो पण आमचा जीव जातो." - तुमच्याप्रमाणे आम्हाला पण जगण्याचा अधिकार आहे. - "आम्हालाही जगू द्या" - मुलांना पटते - ती बागेत जातात.

**(ख) खालील उतारा वाचून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे स्वतःच्या भाषेत लिहा :**

आईने वासंतीला सर्व प्रकारच्या कामांची सवय लावली. तिने तिला स्वयंपाक करावयास शिकविला. त्या दोघी जात्यावर दळणही दळत असत. दळताना त्या सुंदर गाणी म्हणत ! वासंतीची कविता तिच्या गाण्यांवर पोसली आहे. आज अपंग वासंती स्वतःचे काम स्वतः करतेच, पण शिवाय घरातीलही ती सर्वकाही करू शकते. याचे श्रेय ती आपल्या आईला देते. 'शरीर थकले तरी मनाने थकू नये' असे वासंतीची आई नेहमी म्हणे. ते तिच्या मनावर ठसले होते. म्हणूनच घरापासून दूर असलेल्या विद्यापीठात ती जाऊ शकते. तेथील जिने स्वतः चढून एम. ए. च्या वर्गात जाऊन बसते. अडचणींवर मात करणे, जे नाही त्याबद्दल दुःख न करत बसता मार्ग काढणे, ह्यातच माणसाचे माणूसपण आहे. दुःखाने खचून जाण्यात नाही असेच वासंती समजते.

**प्रश्न :**

(1) आईने वासंतीला कोणकोणत्या कामांची सवय लावली ? **2**

(2) वासंतीची आई नेहमी कोणती गोष्ट सांगे ? **1**

(3) वासंतीच्या मते माणसांचे माणूसपण कशात आहे ? **1**

**प्र.9. खालीलपैकी कोणतेही एक पत्र लिहा :** **4**

(1) सुयोग कॉलनी, डॉ. आंबेडकर मार्ग, अमरावतीहून सुभाष/सुमन कोळसे हा/ही पाटीलवाडी, टिळक रोड, सागरमळा, नागपूर येथे राहणारा/राहणारी आपला मित्र/मैत्रीण रमेश/रूपाली जगताप ला शाळेत सावित्रीबाई फुले जयंती कशी साजरी झाली याबाबत कळवितो/कळविते.

(2) मनोहर/मंगला राजवाडे, सिव्हिल लाईन, अचलपूर हा/ही नगराध्यक्ष, अचलपूर यांना पत्र लिहून आपल्या शाळेसमोरील रस्ता नादुरुस्त असल्याची तक्रार करतो/करते.

**किंवा**

खाली दिलेल्या विषयावर वृत्तान्त लिहा.

गावात झालेल्या 'स्वच्छता अभियान' या कार्यक्रमाचा वृत्तान्त लिहा.

**किंवा**

खाली दिलेल्या विषयावर जाहिरात तयार करा :

तुमच्या शाळेत आयोजित केलेल्या 'विज्ञान प्रदर्शनाची' जाहिरात तयार करा.

❑❑❑❑